।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर ■ शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १२६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

स्वतःची तुलना कोणाशीही करू नका,
कारण प्रत्येक फूल आपल्या वेळीच फुलते.

SPOT NEWS

हवाई दलाच्या ताफ्यातील राफेलची संख्या घटली

● **नवी दिल्ली** – भारतीय हवाई दलाच्या ताफ्यातील राफेल लढाऊ विमानांची संख्या ३५ वरून ३२ झाल्याचा दावा ब्रिटिश विमानविषयक नियतकालिकाच्या अहवालातून करण्यात आला आहे. मे २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या लष्करी संघर्षापूर्वी भारतीय हवाई दलाकडे ३५ राफेल विमाने होती. मात्र, आता यापैकी केवळ ३२ विमाने सेवेत असल्याचे फ्लाईट इंटरनॅशनल या नियतकालिकाच्या वार्षिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संघर्षादरम्यान भारताची राफेल विमाने पाडल्याचा पाकिस्तानचा दावा पुन्हा चर्चेत आला आहे. फ्लाईट इंटरनॅशनलने प्रसिद्ध केलेल्या वर्ल्ड एअर फोर्सेसच्या वार्षिक निर्देशिकेत भारतीय हवाई दलाच्या सक्रिय ताफ्यात ३२ राफेल विमानांची नोंद करण्यात आली आहे. पाकिस्तानने मे २०२५ मधील संघर्षादरम्यान हिंदुस्थानी हवाई दलाची अनेक लढाऊ विमाने पाडल्याचा दावा केला होता. या नव्या आकडेवारीमुळे पाकिस्तानच्या दाव्याला बळ मिळाल्याचे शफाकना म्हटले आहे.

१६ जणांचा जीव घेणारा हत्ती जेरबंद

● **नवी दिल्ली** – छत्तीसगडमध्ये गेल्या सहा ते सात महिन्यांत १६ जणांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या काबरा कान नावाच्या हत्तीला वनविभागाने अखेर बेशुद्ध करून ताब्यात घेतले. सहा दिवसांच्या विशेष मोहिमेनंतर बुधवारी ही कारवाई करण्यात आली. सुरगुजा, सूरजपूर आणि बलरामपूर या तीन जिल्ह्यांमध्ये या हत्तीने हल्ले केल्याचा आरोप आहे. कानांवरील वेगळ्या रंगाच्या डागांमुळे स्थानिकांनी त्याला काबरा कान असे नाव दिले आहे. या हत्तीला पकडण्यासाठी वनविभागाच्या २०० हून अधिक कर्मचाऱ्यांनी मोहीम राबवली. त्यासाठी थर्मल ड्रोन, प्रशिक्षित हत्ती , ट्रॅकर्स आणि हत्तींच्या देखभालीचा अनुभव असलेल्या माहुतांची मदत घेण्यात आली. हा हत्ती काही महिन्यांपासून एकटाच फिरत होता. मात्र, अलीकडे तो सुरगुजा जिल्ह्यातील उदयपूर परिसरात १७ हत्तींच्या कळपात सामील झाला होता. त्यामुळे त्याला बेशुद्ध करण्यासाठी योग्य संधी मिळत नव्हती. अखेर रामगडच्या डोंगराळ भागात त्याला कळपापासून वेगळे करण्यात आले. त्यानंतर दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास त्याला बेशुद्ध करणारे इंजेक्शन देण्यात आले. यानंतर वनविभागाने या हत्तीच्या गळ्यात रेडिओ कॉलर बसवला. दुपारी साडेतीनपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याला पुन्हा शुद्धीवर आणून जंगलात सोडण्यात आले. रेडिओ कॉलरच्या मदतीने आता वनविभागाला त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवता येणार असून, तो मानवी वस्तीजवळ आल्यास ग्रामस्थांना सतर्क करता येईल. पुढील काही दिवस त्याच्या वर्तनावर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

राज्यावर १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळाचे संकट

रबी हंगामातील पेरण्या ऐतिहासिक नीचांकावर

● **मुंबई । वीरभूमी–**

राज्यामध्ये यावर्षी म्हणावा तसा पाऊस झाला नाही त्यामुळे दुष्काळी परिस्थिती गंभीर होत चालली आहे. पाणी नसल्यामुळे शेतातील पिकं करपून गेली. पिण्यासाठी पाणी नसल्यामुळे गावागावांत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. यंदाच्या दुष्काळाने १९७२ च्या दुष्काळालाही मागे टाकले. सुपर अल निनोमुळे रबी हंगामात इतिहासातील सर्वांत नीचांकी पेरण्या झाल्या आहेत. रबी हंगामात केवळ साडेचौदा लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. डिसेंबरअखेर २५ लाख हेक्टरवरही पेरण्या पूर्ण होण्याची शक्यता कमीच आहे. १९७२ च्या दुष्काळातही राज्यात ४० लाख २९ हजार हेक्टरवर पेरणी झाली होती.

राज्यात यंदा खरिपानंतर रबी हंगामही संकटात सापडला आहे. यंदा रबी हंगामात आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वांत नीचांकी पेरण्या झाल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीतून उघड झाले आहे. महाराष्ट्रात सरासरी ६० लाख हेक्टरपेक्षा जास्त पेरणी होते. मात्र यंदा सुपर अल निनोमुळे पडलेल्या दुष्काळात केवळ १४ लाख २९ हजार हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. त्यामुळे यंदाचा दुष्काळ १९७२ पेक्षा जास्त भयाण ठरण्याची शक्यता आहे.

कृषी विभागाकडे १९६० पासूनची रबी पेरण्यांची अधिकृत नोंद उपलब्ध आहे. या



आकडेवारीशी तुलना करता यंदाची दुष्काळी स्थिती आजवरची सर्वांत गंभीर ठरली आहे.

राज्याचे रबी हंगामातील सरासरी पेरणी क्षेत्र ५५ ते ६० लाख हेक्टर इतके असते. १९७२-७३ मध्ये झालेल्या एकूण ४७.२९ लाख हेक्टर पेरणीमध्ये ३६.६४ लाख हेक्टरवर अन्नधान्य, ४.३१ लाख हेक्टरवर कडधान्य आणि ६.३४ लाख हेक्टरवर तेलबियांची पिके घेतली गेली होती.

याउलट, यंदा आतापर्यंत झालेल्या १४ लाख ७४ हजार ३०४ हेक्टर पेरणीत ७ लाख ७९ हजार ८१२ हेक्टरवर अन्नधान्य, ६ लाख ७८ हजार ३८५ हेक्टरवर कडधान्य आणि अवघ्या १६ हजार १०६ हेक्टरवर तेलबियांची पेरणी झाली आहे. डिसेंबरअखेरपर्यंत पेरण्या चालल्या तरी एकूण क्षेत्र २० ते २५ लाख हेक्टरच्या पुढे जाण्याची कोणतीही चिन्हे नाहीत.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दुष्काळ निवारणात सरकारचे ठोस नियोजन नसल्याचा आरोप केला. सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये ते म्हणतात की, 'राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतात पेरणी करण्यासाठी पाणी उपलब्ध नाही. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस नियोजन नाही. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याऐवजी सरकार केवळ घोषणाबाजी करण्यात व्यस्त आहे. दुष्काळ आणि अन्नधान्य टंचाईचा सामना करण्यासाठी सरकारचे नियोजन काय आहे? शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, पीकविमा आणि पाणीपुरवठ्याबाबत सरकार काय निर्णय घेणार?, असा सवाल त्यांनी केला आहे.

वडेट्टीवार पुढे म्हणतात की, 'जनावरांच्या चाऱ्याचे, पिण्याच्या पाण्याचे हाल होणार आहेत. शेतकरी इतके अडचणीत असतानाही मायक्रो फायनान्स कंपन्या त्यांच्या जीवावर उठल्या आहेत! महाराष्ट्राचा शेतकरी संकटात असताना सरकारने आकडेवारी लपवण्यापेक्षा वास्तव स्वीकारले पाहिजे. राज्यव्यापी परिस्थितीचा आढावा घेऊन दुष्काळी उपाययोजना, पाणीपुरवठा आणि शेतक-यांना आर्थिक मदत केली पाहिजे. शेतकऱ्यांच्या संकटाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ही वेळ तर शेतकऱ्यांना वाचवण्याची आहे!'

राज्यातील विहिरींनी ५४ वर्षांनंतर गाठला तळ

■ राज्यावर ओढवलेले जलसंकट आता अत्यंत गंभीर आणि भयावह वळणावर येऊन ठेपले आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने (जीएसडीए) जाहीर केलेल्या ताज्या अहवालानुसार, राज्यातील बहुतांश जिल्ह्यांच्या भूजल पातळीत कमालीची घट झाली असून विहिरी कोरड्या पडण्याचे प्रमाण गेल्या पाच दशकांतील उच्चांकावर पोहोचले आहे. १९७२ नंतर प्रथमच अशी विदारक परिस्थिती उद्भवल्याने ग्रामीण महाराष्ट्राचे जनजीवन पूर्णत: विस्कळीत झाले आहे. गेल्या पावसाळ्यात झालेला अनियमित पाऊस आणि पावसातील मोठे खंड यामुळे जमिनीत पाणी मुरलेच नाही. भूजलाचा अनिर्बंध उपसा : बोअरवेलची वाढती संख्या आणि सिंचनासाठी खोलवर घेतलेल्या विंधन विहिरींमुळे भूजलाचे साठे रिते झाले. तापमानात झालेली विक्रमी वाढ आणि उष्णतेच्या लाटांमुळे उरल्यासुरल्या पाण्याचे वेगाने बाष्पीभवन झाले. जलसंधारणाचा अभाव : अनेक ठिकाणी गाळ साचलेले तलाव आणि दुरुस्तीअभावी पडून असलेले बंधारे यामुळे पावसाचे पाणी वाहून गेले. दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना ४० लाख रुपये, विभागीय आयुक्तांना एक कोटी रुपये, नळपाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती, ६० लाख रुपये १ कोटी रुपये, पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक ती तात्पुरती उपाययोजना करणे, १ लाख रुपये, २ लाख रुपये बैलगाडीने पाणी पुरवठा करणे प्रति दिन प्रति बैलगाडी ३००० रुपये.

अहिल्यानगर जिल्ह्यातील २६ हजार ७०३ शेतकरी ओटीएस कर्जमाफीस पात्र!

दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतरच मिळणार कर्जमाफी, ३१ मार्च २०२७ अंतिम मुदत

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत एकरकमी समझोता (ओटीएस) योजनेची पहिली यादी शुक्रवारी जाहीर करण्यात आली. या यादीत अहिल्यानगर जिल्ह्यातील २६ हजार ७०३ शेतकरी पात्र ठरले आहेत. यामध्ये जिल्हा सहकारी बँकेचे १९ हजार ७९२, तर व्यापारी बँकांचे ६ हजार ९११ शेतकरी आहेत. पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. मात्र, दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना त्यावरील स्वतःचा हिस्सा बँकेत भरावा लागणार आहे. ही रक्कम भरण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२७ आहे.

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना सुरू केली. या योजनेत कर्जमाफी, एकरकमी समझोता (ओटीएस) आणि प्रोत्साहनपर लाभ असे तीन घटक आहेत. पहिल्या टप्प्यात कर्जमाफीची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ओटीएस योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

विविध बँकांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे संगणकीय संस्करण करून ही यादी तयार करण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्याचा समावेश नाशिक विभागात करण्यात आला असून, जिल्ह्यातील २६ हजार ७०३ शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांच्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाचा भार शासन उचलणार आहे. मात्र, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाखांवरील रक्कम संबंधित बँकेत जमा करावी लागणार आहे. त्यानंतर बँकेकडून पोर्टलवर माहिती अद्ययावत केली जाईल. शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून दोन लाख रुपयांची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा केली जाणार आहे.

प्रसिद्ध झालेल्या यादीत शेतकऱ्याचे नाव, गाव, बँकेचे नाव, शाखा, कर्जखाते क्रमांक, ३१ मार्च २०२६ अखेरची थकबाकी, ओटीएसनुसार निश्चित केलेली रक्कम, शेतकऱ्याने भरावयाचा हिस्सा आणि शासनाकडून मिळणारा लाभ यांचा तपशील देण्यात आला आहे. ही यादी संबंधित बँक शाखा, विकास सोसायटी आणि ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करून दिली जाणार आहे.

शेतकऱ्याने स्वतःच्या हिश्श्याची रक्कम भरल्यानंतर संबंधित बँकेकडून त्याची माहिती पोर्टलवर अद्ययावत केली जाईल. त्यानंतर तीन दिवसांनी आधार प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. ३१ मार्च २०२७ पर्यंत शेतकऱ्यांना आपल्या हिश्श्याची रक्कम भरता येणार आहे.

दरम्यान, ही ओटीएस योजनेची केवळ पहिली यादी आहे. बँकांकडून प्राप्त होणाऱ्या पुढील माहितीचे संगणकीय संस्करण करून पात्र शेतकऱ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. त्यामुळे पहिल्या यादीत नाव नसलेल्या शेतकऱ्यांनी पुढील याद्यांकडे लक्ष ठेवण्याची गरज आहे.

जिल्हा बँकेच्या पहिल्याच बैठकीत दुष्काळग्रस्तांसाठी एक कोटींची मदत जाहीर!

अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांचा पुढाकार । मदत निधीत कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाने पहिल्याच बैठकीत दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उपाध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांच्यासह सर्व संचालकांनी या निर्णयाला सहमती दर्शवली. विशेष म्हणजे, या मदतनिधीत बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनाचाही सहभाग असणार आहे.



जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन बँकेच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ घेऊन हा निधी त्यांच्याकडे अधिकृतपणे सुपूर्द करण्यात येणार आहे. बँकेच्या कर्मचाऱ्यांनीही एक दिवसाचे वेतन देऊन या मदतकार्यात योगदान देण्याची भूमिका घेतली आहे.

मदतीचा निर्णय घेताना बँकेच्या आर्थिक परिस्थितीचाही गांभीर्याने विचार करण्यात आला. बँकेचे आर्थिक स्थैर्य आणि आर्थिक शिस्त अबाधित राखतानाच जिल्ह्यातील शेतकरी व दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात देणे आवश्यक असल्याची भूमिका अध्यक्ष डॉ. विखे पाटील आणि संचालक मंडळाने घेतली. बँकेची आर्थिक क्षमता लक्षात घेऊनच हा निर्णय घेण्यात आला.

दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेकडून आर्थिक मदत करण्याची परंपरा यापूर्वीही जपण्यात आली आहे. यंदाही सामाजिक बांधिलकीतून बँकेने पुढाकार घेत ही परंपरा कायम ठेवली आहे. बँकेच्या निधीसोबतच कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनाचे योगदान हे या निर्णयाचे विशेष महत्त्व ठरणार आहे.

शेतकऱ्यांचे हित, बँकेची आर्थिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधत नवनिर्वाचित संचालक मंडळाने पहिल्याच बैठकीत मदतीचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या नव्या नेतृत्वाच्या कार्यकाळाची सुरुवात सामाजिक उत्तरदायित्वाच्या महत्त्वपूर्ण निर्णयाने झाली आहे.

राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सव साजरा

छप्पन भोगांच्या नैवेद्याने मंदिर सजले । भजन-कीर्तनातून भक्तिरसाची अनुभूती

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भगवान श्रीकृष्णाला विविध प्रकारच्या मिठाई, फराळ आणि पारंपरिक खाद्यपदार्थांचा छप्पन भोग अर्पण करून महाआरती करण्यात आली. या धार्मिक सोहळ्याला शीख व पंजाबी समाजातील भाविकांसह महिला आणि शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला.

उत्सवाच्या प्रारंभी मंदिर परिसरात भजन-कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम रंगला. गायक गिरीराज जाधव यांनी विविध भक्तिगीतांचे सादरीकरण करून उपस्थितांना भक्तिरसात तल्लीन केले. 'राम राम सीताराम...', 'देना हो तो दीजिये जन्म जन्म का साथ...', 'महाकाल सरकार मेरे...' यांसारख्या भक्तिगीतांनी कार्यक्रमात रंगत आणली. तर 'ओ पालनहारे...' या गीताच्या



सादरीकरणाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला. भगवान श्रीकृष्णाच्या गीतांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. उपस्थित महिला आणि भाविकांनीही भक्तिगीतांचा मनमुराद आनंद घेतला.

दरवर्षी गोवर्धन पूजेनंतर राधा-कृष्ण मंदिरात अन्नकोट महोत्सवाचे आयोजन करण्याची परंपरा आहे. यंदाही या परंपरेचे पालन करत भाविकांनी विविध प्रकारचे गोड पदार्थ, मिठाई, फराळ आणि पारंपरिक खाद्यपदार्थ मंदिरात आणले होते. या सर्व पदार्थांची आकर्षक पद्धतीने मांडणी करून भगवान श्रीकृष्णासाठी छप्पन भोगाचा भव्य नैवेद्य तयार करण्यात आला. भक्तांनी श्रद्धापूर्वक अर्पण केलेल्या या नैवेद्यामुळे मंदिरातील वातावरण अधिकच प्रसन्न आणि मंगलमय झाले होते.

यानंतर पंजाबी सनातन धर्मसभेचे ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता, विश्वस्त मंडळातील सदस्य आणि प्रमुख मान्यवरांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाची विधिवत महाआरती करण्यात आली. आरतीच्या वेळी उपस्थित भाविकांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. आरतीनंतर सर्व भाविकांना महाप्रसाद (लंगर) आणि प्रसादाचे वाटप करण्यात आले. या अन्नकोट महोत्सवात विविध समाजघटकांतील भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भजन-कीर्तन, छप्पन भोगाचा नैवेद्य, महाआरती आणि महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी सर्जेपुरा येथील राधा-कृष्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

दुचाकीला अज्ञात वाहनाची धडक; एक ठार, एक जखमी

घातपाताचा संशय व्यक्त करत नातेवाइकांचे रास्ता रोको

● **पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील शेवगाव ते तिसगाव रोडवरील आदिनाथनगर येथील पेट्रोल पंपाजवळ अज्ञात वाहनाने बुलेटला दिलेल्या जोरदार धडकेत अक्षय अण्णा फुलारी (वय २८, रा. कासार पिंपळगाव) याचा जागीच मृत्यू झाला, तर संतोष माणिक खवले (वय ३२, रा. सोमठाणे नलवडे) गंभीर जखमी झाला. गुरुवारी (दि. १९) रात्री आठच्या सुमारास हा अपघात झाला. धडक दिल्यानंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. दरम्यान, हा अपघात नसून घातपात असण्याची शक्यता नातेवाइकांनी व्यक्त केल्याने परिसरात खळबळ उडाली.



अक्षय फुलारी आणि संतोष खवले हे दोघे वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्यावरून बुलेटने कासार पिंपळगावकडे जात होते. आदिनाथनगरजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या बुलेटला जोरदार धडक दिली. या अपघातात अक्षयचा जागीच मृत्यू झाला, तर संतोष गंभीर जखमी झाला. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेनंतर संतप्त नातेवाइकांनी अज्ञात वाहनचालकाचा शोध घेऊन अपघाताचा सखोल तपास करण्याची मागणी करत शेवगाव-तिसगाव रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन केले. काही नातेवाइकांनी घातपाताचा संशयही व्यक्त केला. त्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांनी घटनास्थळी धाव घेऊन नातेवाइकांशी चर्चा केली. सखोल तपास करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. त्यानंतर नातेवाइकांनी अक्षयचा मृतदेह ताब्यात घेतला.

वीरभूमी

SPOT NEWS

समशेरपूर मंडळात शेतकऱ्यांना कृषी मार्गदर्शन; मसूर बियाण्यांचे वाटप!

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील आढळा विभागातील समशेरपूर कृषी मंडळाच्या वतीने दगडवाडी, शेरवाडी, पाडोशी आणि चंदगिरवाडी येथे शेतकरी मार्गदर्शन व मसूर बियाणे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमांना शेकडो शेतकरी उपस्थित राहून कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. दगडवाडी येथे कळमजाई गटातील शेतकरी सदस्यांच्या उपस्थितीत मसूर बियाण्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी संदीप जोर्वेकर यांनी बीजप्रक्रियेचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच रब्बी हंगामातील प्रमुख पिकांचे लागवड व्यवस्थापन आणि कमी पाण्यात पिकांची लागवड कशी करावी, याबाबत मार्गदर्शन केले. उपकृषी अधिकारी साहेबराव वायळ यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली, तर सहाय्यक कृषी अधिकारी चंद्रकांत गिऱ्हे यांनी जनजाती सप्ताहानिमित्त राबविण्यात येणाऱ्या कृषी योजनांची माहिती सांगितली. शेरवाडी आणि पाडोशी येथे झालेल्या कार्यक्रमात उपकृषी अधिकारी साहेबराव वायळ यांनी बीजप्रक्रियेचे महत्त्व पटवून दिले. सहाय्यक कृषी अधिकारी राघू पेढेकर यांनी चारा पिकांच्या लागवडीबाबत मार्गदर्शन केले, तर सहाय्यक कृषी अधिकारी अनिल बांबरे यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. चंदगिरवाडी येथे आयोजित कार्यक्रमात मंडळ कृषी अधिकारी संदीप जोर्वेकर यांनी 'आत्मा' योजनेंतर्गत शेतकरी गटांची नोंदणी कशी करावी, याची सविस्तर माहिती दिली. सहाय्यक कृषी अधिकारी रवींद्र मांडवे यांनी मसूर मिनिकिट बियाण्यांसाठी उपस्थित महिला शेतकऱ्यांची पोर्टलवर नोंदणी करून घेतली. सहाय्यक कृषी अधिकारी नाथू शेंडे यांनी कृषी विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. या कार्यक्रमांमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये रब्बी हंगामातील पीक व्यवस्थापन, बीजप्रक्रिया आणि शासनाच्या कृषी योजनांबाबत जनजागृती झाली. या उपक्रमाबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमांना ग्रामस्थ आणि बचत गटांतील महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पाथर्डीत ठाकरे शिवसेनेच्यावतीने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

● **पाथर्डी । वीरभूमी –**

जाती – पातीचे विचार न करता सर्व सामान्य कार्यकर्त्याला आमदार खासदार मंत्री बनविणारे, मराठी तरुणाच्या मनामनात स्वाभिमाची ज्योत पेटविणारे शिवसेना प्रमुख अद्वितीय नेतृत्व होते असे नेतृत्व पुन्हा होणे नाही असे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी सदस्य विष्णुपंत पवार यांनी केले. दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिना निमित्त पाथर्डी तालुक्यातील शिवसैनिकाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्या प्रसंगी पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षक सेनेचे तालुका प्रमुख नंदकुमार डाळिंबकर होते. यावेळी जेष्ठ शिवसेना नेते आदर्श सरपंच नवनाथ चव्हाण शहर संघटक संतोष मेघूंडे, मल्हारी खेडकर, मारुती राठोड, योगिनी क्षीरसागर, निकिता उंडे, सुनील जरे, दत्तात्रय दुधाळ, प्रकाश चांदणकर, जावेद शेख आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना श्री पवार म्हणाले की, परप्रांतीयांनी स्थानिक मराठी तरुणांच्या नोकऱ्यावर कब्जा केला आणि त्याकाळचे राजकारणी त्याकडे दुर्लक्ष करीत होते त्याविरोधात मराठी तरुणांना रस्त्यावरची लढाई साठी प्रवृत्त केले. कधी काळी प्रस्तापित राजकारण्याच्या विरोधात सर्व सामान्य कुटूंबातील कार्यकर्त्यांना राजकारणात आणून त्यांना सत्ता मिळवून दिल्याचे सांगितले. सूत्रसंचालन बाळासाहेब धावडे, प्रस्ताविक प्रदीप भोसले तर आभार संदीप खोजे यांनी मानले.

समान काम समान वेतन साठी न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर

● **अकोले । वीरभूमी –**

समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी राजूर तालुका अकोले येथील न्यायालयीन कर्मचारी आज (१७ नोव्हेंबर) पासून बेमुदत संपावर जात आहेत. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारीही सहभागी झाले आहेत. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीने मंजूर करून शासनाकडे पाठवला आहे. मात्र, या प्रस्तावाला २१ महिने उलटूनही शासनाकडून अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. ३१ जानेवारी २०२५ पासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असूनही शासनाने गांभीर्याने दखल घेतलेली नसल्याचा आरोप महासंघाने केला आहे. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करून न्याय मिळावा, यासाठी महासंघाने बेमुदत संपाचे पाऊल उचलले आहे. शासनाने अधिकृत शासन निर्णय काढल्याशिवाय संप मागे घेतला जाणार नाही, अशी ठाम भूमिका महासंघाने घेतली असून मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

भाजपच्या बोधेगाव मंडलाध्यक्षांना बेदम मारहाण करत सोन्याची चेन, २२ हजारांची रोकड लुटली!

शेवगावमध्ये रस्त्यावर गाडी उभी करण्याच्या वादातून हल्ला । भाजप पदाधिकाऱ्यांचा पोलीस ठाण्यात ठिय्या, आरोपींच्या अटकेची मागणी

● **शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव–नगर रस्त्यावरील कामाच्या ठिकाणी गाडी उभी करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून भाजपचे बोधेगाव मंडलाध्यक्ष संजय टाकळकर यांना आठ जणांनी मारहाण करून लुटल्याची घटना गुरुवारी (ता. १९) रात्री घडली. हल्लेखोरांनी त्यांच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोन्याची चेन आणि खिशातील २२ हजार ४०० रुपये हिसकावून घेतले. याप्रकरणी सलमान इनामदार, अरबाज इनामदार आणि सहा अनोळखी साथीदारांविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संजय रामनाथ टाकळकर (वय ४७, रा. घोटण, ता. शेवगाव) हे गुरुवारी रात्री साडेअकराच्या सुमारास कारने (एमएच १६ बीझेड ०५४०) शेवगावहून नगर रस्त्याने घोटणकडे जात होते. शहरातील आंबेडकर चौक ओलांडल्यानंतर तारा पान स्टॉलसमोर रस्त्याचे काम सुरू असल्याने त्यांनी कार थांबवली. रस्त्यावरील विद्युत खांब पडल्याने त्यांनी कामगारांना काम थांबवून खांब बाजूला करण्यास सांगितले.

याचवेळी समोरून आलेल्या थार गाडीतील



(एमएच १६ ६४६४) चालकाने कार रस्त्यात का उभी केली, अशी विचारणा करत वाद घातला. त्यानंतर सलमान इनामदार, अरबाज इनामदार व त्यांच्या सहा साथीदारांनी टाकळकर यांना कारमधून खाली ओढून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकीही दिली. यावेळी त्यांच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोन्याची चेन आणि खिशातील २२ हजार ४०० रुपये हिसकावून घेतले. अरबाज इनामदार याने हातातील गजाने टाकळकर यांच्या उजव्या हाताच्या करंगळीवर वार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी भाजपचे शेवगाव मंडलाध्यक्ष महेश फलके, गणेश रांधवणे, डॉ. नीरज लांडे, बापू धनवडे, नगरसेवक गणेश कोरडे, तुषार पुरनाळे, अण्णासाहेब ढोके, संदीप खरड, राम गोरे बाळासाहेब डोंगरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शेवगाव पोलीस ठाण्यात ठिय्या दिला.

पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या आदेशानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल अजिनाथ बडे करीत आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी राजगुरू यांनीही पोलीस ठाण्यात भेट देऊन भाजप पदाधिकारी आणि पोलीस निरीक्षक बोरसे यांच्याशी चर्चा केली.

अवैध धंदे बंद करा, अन्यथा आंदोलन!

■ शेवगाव शहरात अवैध धंदे कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत, हे जनतेला माहिती आहे. या व्यवसायांतून लाखो रुपये कमावून सामान्य नागरिकांना त्रास देण्याचे प्रकार सुरू आहेत. शहरात दररोज मारहाणीच्या घटना घडत असून आता भाजपच्या पदाधिकाऱ्यालाही लक्ष्य करण्यात आले आहे. त्यामुळे पोलिसांनी २४ तासांत आरोपींना अटक करावी आणि शहरातील अवैध व्यवसाय तातडीने बंद करावेत, अशी मागणी भाजपचे शेवगाव मंडलाध्यक्ष महेश फलके यांनी केली.

श्रीगोंद्यात शिवसेनेच्या वतीने दिवाळी शिधा वाटप

गरजू कुटुंबांपर्यंत सन्मानाने शिधा पोहोचविण्याचा शिवसैनिकांचा निर्धार



● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

दिवाळीच्या सणात सर्वसामान्य व गरीब कुटुंबांचा आनंद द्विगुणित करण्याच्या उद्देशाने उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वतीने श्रीगोंदा तालुक्यातील गरजू कुटुंबांसाठी पाठविण्यात आलेल्या दिवाळी शिध्याचे श्रीगोंदा शहरात शिवसेनेच्या वतीने वाटप करण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, उपजिल्हाप्रमुख मनोहर पोटे आणि संतोष शिंदे उपस्थित होते. तालुक्यातील प्रत्येक गरजू व सर्वसामान्य कुटुंबापर्यंत सन्मानाने शिधा पोहोचविण्याची जबाबदारी शिवसैनिक पार पाडतील, असा निर्धार जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी तालुकाप्रमुख नंदकुमार ताडे, युवासेना तालुकाप्रमुख निलेश गोरे, महिला आघाडी तालुकाप्रमुख मीरा खेंडके, शहरप्रमुख नितीन गायकवाड, युवासेना उपजिल्हाप्रमुख हेमंत लोखंडे, युवासेना तालुका संघटक प्रतीक बोरकर, उपतालुकाप्रमुख शुभम गायकवाड, अल्पसंख्याक आघाडी तालुकाप्रमुख समीर काझी, नगरसेवक अनिल औटी, सुशील शिंदे, पांडुरंग पोटे, कुणाल शिरवाळे, अल्ताफ शेख, किरण बणसुडे, सागर रसाळ यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषी महाविद्यालयांत मराठा विद्यार्थ्यांना ओबीसींप्रमाणे शैक्षणिक सवलती! : मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

चारही कृषी विद्यापीठांतील संलग्न महाविद्यालयांना वर्ष २०२६-२७ पासून निर्णय लागू

● **शिर्डी । वीरभूमी–**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या कृषी व संलग्न महाविद्यालयांमध्ये मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक शुल्क सवलती आणि विविध सुविधांचा लाभ देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आला असून, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून त्याची अंमलबजावणी होणार असल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



राज्य सरकारने ५ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांना ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक सवलती देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी संबंधित विभागांना दिले आहेत.

ओबीसी विद्यार्थ्यांना लागू असलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क मराठा विद्यार्थ्यांकडून आकारू नये. तसेच शुल्क भरले नसल्याच्या कारणावरून प्रवेश प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही संबंधित शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत.

या निर्णयानुसार राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या कृषी व संलग्न महाविद्यालयांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क आणि इतर शुल्क सवलतींचा लाभ आता मराठा विद्यार्थ्यांनाही मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सहकार्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

प्रवेश शुल्क, विद्यापीठ विद्यार्थी सहाय्यता निधी व कल्याण निधी, महाविद्यालयीन मासिक शुल्क, विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी, विद्यापीठ अश्वमेध निधी, जिमखाना शुल्क, नोंदणी शुल्क, विद्यापीठ वैद्यकीय मदत निधी आणि विद्यार्थी ओळखपत्र निधी अशा विविध शुल्कांमध्ये मराठा विद्यार्थ्यांना ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे सवलती मिळणार आहेत.

महायुती सरकारच्या या निर्णयामुळे कृषी शिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून या सवलती लागू करण्याबाबत आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्याचे मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

कोतूळेश्वर विद्यालयात ४० वर्षांनंतर बालमित्रांचा स्नेहमेळावा उत्साहात!

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील कोतूळ येथील कोतूळेश्वर विद्यालयाच्या सन १९८६–८७ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा तब्बल ४० वर्षांनंतर मोठ्या उत्साहात पार पडला. चार दशकांनंतर बालपणीचे मित्र–मैत्रिणी एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि आनंदासह भावुक क्षणांची अनुभूती उपस्थितांनी घेतली.

'पुन्हा एकदा शाळेतल्या जुन्या आठवणींना उजाळा' या संकल्पनेतून आयोजित मेळाव्यात माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शाळेतील दिवस, मित्रांसोबतच्या गमतीजमती आणि बालपणीचे किस्से यांना उजाळा देताना अनेकजण जुन्या आठवणींत रमले. डोक्यावर पांढरी टोपी, अंगात पांढरा हाफ शर्ट आणि खाकी हाफ चड्डी असा त्यावेळचा शालेय गणवेश आठवत अनेक माजी विद्यार्थी भावूक झाले.

आज हे सर्व विद्यार्थी उद्योग, व्यवसाय, शेती, शिक्षण आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. चार दशकांनंतर झालेल्या या भेटीत एकमेकांच्या अनुभवांची, विचारांची आणि कार्यक्षेत्रातील संधींची देवाणघेवाण झाली. भविष्यातही एकमेकांच्या सुख–दुःखात सहभागी होऊन परस्परांना सहकार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी प्राचार्य जिजाराम गोडे, माजी प्राचार्य भागवत देशमुख, पत्रकार सुनील गिते, शांताराम देशमुख, बुधा नाडेकर, चांगदेव डोंगरे, मालती सोनुले, शोभा देशमुख, सलीम पठाण, बुधाजी गंभीरे, मनेश देशमुख, बाळासाहेब गंभीरे, बाळासाहेब देशमुख, निवृत्ती देशमुख आणि बाळासाहेब साबळे यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेतील आठवणींना उजाळा देतानाच शाळेच्या विकासासाठी आणि एकमेकांच्या सुख–दुःखात सहभागी होण्यासाठी यापुढेही



एकत्र राहण्याचा निर्णय त्यांनी घेतला. 'आपण ज्या गावच्या मातीत आणि शाळेत घडलो, त्या ठिकाणाबद्दल प्रत्येकाच्या मनात जिव्हाळा आणि प्रेम असते. जुन्या मित्रांनी एकत्र येऊन विचारांची व ज्ञानाची देवाणघेवाण करावी, या उद्देशाने हा स्नेहमेळावा आयोजित केला,' असे संजय आरोटे, सुनील बनोटे, अरविंद देशमुख, किसन वाघमारे, बापू देशपांडे, बाळासाहेब काळे, विनय वाकचौरे आणि एस. पी. देशमुख यांनी सांगितले.

मेळाव्याच्या शेवटी सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र स्नेहभोजनाचा आनंद घेतला आणि पुन्हा भेटण्याच्या आठवणींसह एकमेकांचा निरोप घेतला.

दहा वर्षांपासून धूळखात पडलेले श्रीगोंदा क्रीडा संकुल सुरू करसाठी आंदोलन

४०० मीटर धावण्याचा ट्रॅक विकसित करा; अपूर्ण अभ्यासिकाही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्याची मागणी, युवक-विद्यार्थ्यांचे आंदोलन

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

गेल्या दहा वर्षांपासून धूळखात पडलेले श्रीगोंदा तालुका क्रीडा संकुल तातडीने सुरू करावे, ४०० मीटर धावण्याचा ट्रॅक विकसित करावा आणि नगरपरिषद हद्दीतील अपूर्ण अभ्यासिकेचे काम पूर्ण करून ती विद्यार्थ्यांसाठी खुली करावी, या मागण्यांसाठी विद्यार्थी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रशांत ओगले यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. १६) युवक व विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. खेळाडूंना सरावासाठी मैदान नाही, तर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जागा नाही. युवकांच्या भविष्याशी खेळणे थांबवा आणि प्रलंबित सुविधा तातडीने उपलब्ध करून द्या, अशी मागणी आंदोलकांनी केली.

श्रीगोंदा तालुक्यातील अनेक युवक पोलीस भरती, सैन्य भरती तसेच विविध क्रीडा स्पर्धांची तयारी करीत आहेत. मात्र, सरावासाठी आवश्यक सुविधा नसल्याने त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तालुका क्रीडा संकुलासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होऊनही ते पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाही. त्यामुळे या संकुलाचा उपयोग खेळाडूंना नेमका कधी होणार, असा सवाल युवकांनी उपस्थित केला.

क्रीडा संकुलाच्या जागेत ४०० मीटर धावण्याचा ट्रॅक विकसित करून दिवाबत्तीची व्यवस्था करावी. जिम्नॅशियम हॉल, बॅडमिंटन कोर्ट आणि अन्य क्रीडा सुविधा दुरुस्त करून खेळाडूंसाठी खुल्या कराव्यात. या कामांसाठी शासनाने तातडीने निधी मंजूर करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. या मैदानाचा उपयोग पोलीस व सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवारांसह शहरातील नागरिकांना व्यायाम आणि मॉर्निंग वॉकसाठीही होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.

दुसरीकडे, श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीतील अभ्यासिकेचे बांधकाम अपूर्ण असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. ग्रामीण भागातून शहरात येऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शांत आणि अभ्यासासाठी पोषक जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे अभ्यासिकेचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करून ती विद्यार्थ्यांसाठी खुली करावी, अशी मागणीही करण्यात आली.

क्रीडा संकुल आणि अभ्यासिका या केवळ बांधकामाच्या सुविधा नसून युवकांच्या शैक्षणिक व क्रीडा भवितव्याशी निगडित प्रश्न आहेत. शासन, लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन निधी मंजूर करावा, रखडलेली कामे पूर्ण करावीत आणि दोन्ही सुविधा सुरू करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी आंदोलनाद्वारे करण्यात आली.

या आंदोलनात बाजार समितीचे संचालक प्रशांत ओगले, शरद चाकणे, संतोष भोईटे, शंकर कोठारी, सतीश बोरुडे, असलम शेख, धनंजय काळे, प्रशांत सिदनकर, सूरज शेख, समीर शिंदे, ओंकार तांबे, सोनू आढावा, नयन पोकळे, बालाजी गदादे, सचिन गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

खेळाडू घडविण्यासाठी उभारलेल्या श्रीगोंदा तालुका क्रीडा संकुलाची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. संकुलाचे दरवाजे आणि खिडक्या तुटल्या असून परिसरात कचरा व घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सर्वत्र वेड्या बाभळी आणि काटेरी झुडपे वाढली आहेत. जिम्नॅशियम हॉल, बॅडमिंटन कोर्ट आणि स्वच्छतागृहांचीही दुरवस्था झाली आहे. धावण्याच्या मैदानावर दगडधोंडे आणि काटेरी वनस्पती उगवल्याने खेळाडूंना सराव करणे कठीण झाले आहे. संकुल परिसर मद्यपान करणाऱ्यांचा अड्डा बनल्याच्या तक्रारीही आहेत. क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी आणि विविध सुविधांसाठी लाखो रुपयांचा निधी खर्च झाला. मात्र, या निधीचा विनियोग नेमका कसा झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. बांधकामाच्या दर्जाबाबत तसेच आर्थिक गैरव्यवहाराच्या संशयाबाबत स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे. तालुका क्रीडा समितीचे अध्यक्षपद आमदारांकडे असतानाही संकुलाची अशी दुरवस्था का झाली, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत



आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील क्रीडा क्षेत्रात तालुका क्रीडा अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबतही नाराजी व्यक्त होत आहे. विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन, क्रीडा उपक्रम आणि अन्य कामकाजात टक्केवारी दिल्याशिवाय कामे होत नसल्याचे आरोप क्रीडा क्षेत्रातील काही घटकांकडून केले जात आहेत. या आरोपांची सत्यता तपासण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाची स्वतंत्र चौकशी होणे गरजेचे आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी असलेल्या यंत्रणेबाबतच असे आरोप होत असतील, तर क्रीडा क्षेत्राचा विकास कसा होणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने या आरोपांची दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

SPOT NEWS

आ. विवेक कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश; ३ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर!

● कोपरगाव । वीरभूमी–



कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांच्या विकासासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद, अहिल्यानगरच्या माध्यमातून ३ कोटी ३४ लाख २५ हजार रुपयांच्या ७० विकासकामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे मतदारसंघातील विविध गावांमधील मूलभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. मंजूर कामांमध्ये पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा, अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, पेव्हर ब्लॉक बसविणे, बीज रस्त्यांची कामे, गटार बांधकाम, रस्त्यांचे मजबुतीकरण आणि समाजमंदिर उभारणी अशा विविध विकासकामांचा समावेश आहे. या निधीतून आंचलगाव, बोलकी, ब्राह्मणगाव, काकडी, कुंभारी, करंजी, कोळपेवाडी, कासली, चासनळी, चांदेकसारे, देर्डे कोऱ्हाळे, धामोरी, धोत्रे, धारणगाव, तळेगाव मळे, मनेगाव, मढी बुद्रुक, मंजूर, मळेगाव थडी, जवळके, जेऊर कुंभारी, सुरेगाव, शिंगणापूर, वेस-सोयगाव, डाऊच बुद्रुक, रवंदे, टाकळी, कोळगाव थडी आणि वेळापूर आदी गावांतील वस्त्यांमध्ये विकासकामे केली जाणार आहेत. या कामांमुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांना बळकटी मिळणार असून, नागरिकांना पाणीपुरवठा, रस्ते, गटार आणि समाजमंदिर यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. जिल्हा नियोजनांतर्गत मंजूर झालेल्या या निधीमुळे कोपरगाव मतदारसंघातील विविध गावांच्या विकासाला गती मिळणार आहे.

अकोले नगरपंचायत हद्दीतील विकासकामांसाठी १५ कोटींचा निधी मंजूर : मारुती मेंगाळ

● अकोले । वीरभूमी–

अकोले नगरपंचायत हद्दीतील विविध विकासकामांसाठी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख तथा माजी उपसभापती मारुती मेंगाळ यांनी ही माहिती दिली. मंजूर निधीमध्ये प्रवरा नदीवरील अगस्ती पूल ते स्मशानभूमीपर्यंत संरक्षण भिंत व सुशोभीकरणासाठी ६ कोटी, पानसरवाडी ते रोहिदास पानसरे वस्ती रस्त्याच्या सुधारणेसाठी ४ कोटी, तर अकोले-धामणगाव आवारी रस्त्यावरील शाहूनगर ते साई अमृत सोसायटीपर्यंत मुख्य रस्ता व जोडरस्त्यांच्या सुधारणेसाठी ५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. प्रवरा नदीला पाण्याचा विसर्ग वाढल्यास नदीकाठच्या नागरिकांना धोका निर्माण होतो. त्यामुळे संरक्षण भिंतीचे काम नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच रस्त्यांच्या सुधारणेमुळे नागरिकांना दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत शिर्डी साई संस्थानचे विश्वस्त डॉ. जालिंदर भोर यांच्या पुढाकारातून हा निधी मंजूर झाला. निधी मंजूर केल्याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिवसेनेचे जगन देशमुख, सुशांत गजे, बाळासाहेब भोर, सचिन शेटे, प्रकाश पाचपुते व मुकुंद भोर यांनी आभार व्यक्त केले.

पानसरवाडी स्मशानभूमीच्या जागेवरील अतिक्रमणाचा वाद चिघळला

● अकोले । वीरभूमी–

अकोले नगरपंचायत हद्दीतील पानसरवाडी येथील स्मशानभूमीच्या जागेवरून वाद निर्माण झाला असून, या जागेवरील अतिक्रमण आणि सुरू असलेल्या उत्खननाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याप्रकरणी नगरपंचायतीकडे लेखी माहिती मागविण्यात आली असून, नगरपंचायतीने संबंधितांना उत्खननाचे काम तात्काळ बंद करण्याची नोटीस बजावली आहे. पानसरवाडी येथील सर्व्हे नंबर ६३ लगत प्रभाग क्रमांक १७ मधील स्मशानभूमीच्या जागेचे सपाटीकरण, तार कंपाउंड आणि अतिक्रमणाबाबत नगरसेविका कविता परशुराम शेलके यांनी नगरपंचायतीकडे पत्राद्वारे तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने नगरपंचायतीने संबंधित परिसराची पाहणी केली असता स्मशानभूमीच्या रस्त्याच्या पश्चिम बाजूस उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी मुख्याधिकारी धनश्री पवार यांनी अनिल शांताराम पानसरे, अतुल शांताराम पानसरे व संबंधितांना नोटीस देऊन सुरू असलेले उत्खनन तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच संबंधित जागेच्या मालकी हक्काचे पुरावे, मोजणी नकाशा व इतर आवश्यक कागदपत्रे नगरपंचायत कार्यालयात सादर करण्यास सांगितले आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही या प्रकरणी नोटीस देण्यात आली होती. मात्र, उत्खननाचे काम बंद करण्यात आले नसल्याचे नगरपंचायतीच्या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची प्रत तहसीलदार अकोले व पोलीस निरीक्षक अकोले यांनाही पाठविण्यात आली.

कीर्तनकारांच्या व्यसनमुक्ती प्रबोधन अभियानाची अगस्ती आश्रमातून सुरुवात!

● अकोले । वीरभूमी–



अकोले तालुका दारूबंदी आंदोलन आणि साऊ एकल महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी पाडव्याच्या पहाटे अगस्ती आश्रमात कीर्तनकारांच्या उपस्थितीत व्यसनमुक्ती प्रबोधन अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. कीर्तनातून किमान पाच ते दहा मिनिटे दारू आणि गुटख्याच्या दुष्परिणामांवर प्रबोधन करावे, असे आवाहन यावेळी तालुक्यातील कीर्तनकारांना करण्यात आले.

दिवाळी पाडव्यानिमित्त अगस्ती आश्रमात 'दिवाळी पहाट' भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील प्रमुख कीर्तनकार आणि दारूबंदी आंदोलनाचे कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व कीर्तनकारांना दारू व गुटख्याच्या व्यसनांचे दुष्परिणाम सांगणारे साहित्य देण्यात आले. तसेच महाराष्ट्र नशाबंदी मंडळाने प्रसिद्ध केलेली संतांच्या व्यसनविरोधी अभंगांची पुस्तिकाही भेट देण्यात आली.

दारूच्या दुष्परिणामांची माहिती देणाऱ्या घडीपत्रिकेचे प्रकाशन आमदार डॉ. किरण लहामटे, लेखक डॉ. अनिल सहस्रबुद्धे, अगस्ती आश्रम देवस्थानचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ, प्रमुख कीर्तनकार आणि दारूबंदी कार्यकर्त्यांच्या हस्ते करण्यात आले. अवैध दारू रोखण्याबरोबरच गावोगावी व्यसनमुक्तीचे प्रबोधन केले जाईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

दारूबंदी आंदोलनाचे कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात दारूविरोधी संघर्षाबरोबरच प्रबोधनाचीही गरज असल्याचे सांगितले. लहान मुलांमध्ये व्यसनांचे प्रमाण वाढत असल्याने तालुक्यातील प्रत्येक गाव, शाळा आणि महाविद्यालयात जाऊन व्यसनमुक्तीचे प्रबोधन केले जाणार आहे. कीर्तनकारांच्या सहभागामुळे या चळवळीला निश्चितच गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी व्यसनमुक्त जीवन हेच आदर्श जीवन असल्याचे सांगितले. कीर्तनकारांनी आपल्या कीर्तनातून व्यसनमुक्तीचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवावे, असे आवाहन त्यांनी केले. या प्रबोधनामुळे अकोले तालुका व्यसनमुक्त होण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. अगस्ती देवस्थान आणि तालुक्यातील वारकरी संप्रदायातील सर्व कीर्तनकार व्यसनमुक्ती चळवळीला पाठबळ देतील. कीर्तन, प्रवचन आणि सप्ताहांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचे काम केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. अगस्ती देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त व कीर्तनकार दीपक महाराज देशमुख यांनी प्रास्ताविक केले. व्यसनमुक्त संघ आणि तालुक्यात आयोजित होणाऱ्या बालसंस्कार शिबिरांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचे काम अधिक प्रभावीपणे केले जाईल. व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी वारकरी संप्रदाय कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. प्राचार्य अनिल सहस्रबुद्धे, राजेंद्र महाराज सदगीर, राजेंद्र महाराज नवले, नितीन महाराज गोडसे, ॲड. वसंतराव मनकर, किरण महाराज शेटे, कुलदीप नेवासकर, चंद्रकांत महाराज चौधरी, रोहित महाराज राक्षे, संदीप महाराज सावंत, तसेच प्रा. मच्छिंद्र देशमुख, जालिंदर बोडके, महेश सोनवणे, ललित छल्लारे, हरिभाऊ फापाळे, माधव तिटमे, नगरसेवक प्रतिभा मनकर, कैलास आरोटे, सुनील शेळके, अनिल कोळपकर, गणेश नवले, प्रतिमा कुलकर्णी, वैशाली राजगुरू आदी उपस्थित होते. याशिवाय गणेश महाराज वाकचौरे, अरुण महाराज शिर्के, संदीप महाराज थोरात, शांताराम महाराज पापळ, ज्ञानराज पापळ, विशाल वाघमारे, इंद्रभान कोल्हाळ, संतोष चौधरी, रामनाथ मुर्तडक, मच्छिंद्र भरीतकर आदि उपस्थित होते.

दुष्काळाच्या झळांवर चंदगीरवाडी व इदेवाडी शाळेतील चिमुकल्यांचा जलसंवर्धनाचा उतारा; विद्यार्थ्यांनी बांधले दोन वनराई बंधारे!

● अकोले । वीरभूमी –



दुष्काळसदृश परिस्थितीत जलसंवर्धनाचे महत्त्व ओळखून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चंदगीरवाडी व इदेवाडी (केंद्र खिरविरे) येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आढळा नदीवर श्रमदानातून दोन वनराई बंधारे बांधले. या बंधाऱ्यांमध्ये अनुक्रमे सुमारे ७० हजार आणि ४० हजार लिटर पाणीसाठा झाला आहे. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

एकदिवसीय क्षेत्रभेटीअंतर्गत विद्यार्थ्यांनी उपक्रमशील शेतकरी गणेश चंदगीर यांच्या शेताला भेट दिली. यावेळी सरी-वरंबा पद्धतीने पारंपरिक सिंचन, ठिबक आणि तुषार सिंचन पद्धतींची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. तसेच बायोगॅस प्रकल्प, भातकापणी, झोडणी, उफणणी ही शेतीकामे, शेतीची अवजारे आणि आधुनिक मशागतीच्या तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

यानंतर विद्यार्थ्यांनी हातात टिकाव आणि फावडे घेऊन शिक्षकांसोबत आढळा नदीवर दोन वनराई बंधारे बांधले. शिक्षक रामदास आवारी व विकास भागीत यांनी विद्यार्थ्यांसोबत श्रमदान केले. बंधाऱ्यांमध्ये पाणी साठल्यानंतर विद्यार्थी व शिक्षकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. परिसरातील पालक व शेतकऱ्यांनीही या उपक्रमाला भेट देऊन कौतुक केले.

दुष्काळी परिस्थितीत राबविलेला हा उपक्रम पशुपक्षी, वन्यजीव, जनावरे, शेती आणि माणसांसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे नवनाथ आव्हाड, धोंडू इथे, किसन इदे, बुधा इदे आणि बाळासाहेब इदे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या सूचनेनुसार तसेच पंचायत समिती अकोलेचे गटशिक्षणाधिकारी दीपक धुमाळ, शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर माळवे आणि केंद्रप्रमुख विजय भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या या श्रमदानाचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, शालेय पदाधिकारी, ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले. चिमुकल्यांनी प्रत्यक्ष कृतीतून जलसंवर्धनाचा दिलेला संदेश परिसरासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

भंडारदरा धरणाच्या शताब्दीनिमित्त २५ कोटींच्या कार्यक्रमाचे नियोजन!

जलसंपदा विभागाकडून ई-निविदा प्रसिद्ध । पार्किंग व कार्यक्रमासाठी आठ एकर जागेचे नियोजन

● अकोले । वीरभूमी–



भंडारदरा धरणाच्या शंभराव्या वर्धापन दिनानिमित्त भव्य कार्यक्रम आयोजित करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या अहिल्यानगर पाटबंधारे विभागाने २५ कोटी रुपये अंदाजित खर्चाची ई-निविदा प्रसिद्ध केली आहे. या निविदेमुळे धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाची चर्चा सुरू झाली असून, या खर्चाच्या नियोजनाकडे अकोले तालुक्याचे लक्ष लागले आहे.

अहिल्यानगर पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या वतीने ई-निविदा सूचना क्रमांक १२ (सन २०२६-२७) प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये भंडारदरा धरणाच्या शंभराव्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे चार दिवसांचे नियोजन असून, कार्यक्रमस्थळ आणि पार्किंगसाठी सुमारे आठ एकर क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. या कामाची अंदाजित किंमत जीएसटी वगळून २५ कोटी रुपये दर्शविण्यात आली आहे. यासाठी पात्र सल्लागार आणि संबंधित कंपन्यांकडून ऑनलाइन निविदा मागविण्यात आल्या आहेत.

निविदा दस्तऐवज १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत डाउनलोड करता येणार आहेत. ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत आहे. तर तांत्रिक निविदा २ डिसेंबर २०२६ रोजी उघडण्यात येणार असल्याचे निविदा सूचनेत नमूद करण्यात आले आहे.

भंडारदरा धरण हे अकोले तालुक्याच्या विकासाचे महत्त्वाचे केंद्र असून, परिसरातील शेती, पर्यटन आणि जलसंपत्तीच्या दृष्टीने त्याला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त होणाऱ्या या चार दिवसीय सोहळ्याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. विशेषतः २५ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चामुळे या आयोजनाची चर्चा सुरू झाली आहे.

शेवगावात 'छत्रपती चषक २०२६' क्रिकेट स्पर्धेचा दिमाखात शुभारंभ!

२४ संघांचा सहभाग; विजेत्यांना दोन लाखांहून अधिक रुपयांची बक्षिसे

● शेवगाव । वीरभूमी–



अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शेवगाव येथे आयोजित 'छत्रपती चषक २०२६' क्रिकेट स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ झाला. आखेगाव येथील श्री जोग महाराज संस्कार केंद्राचे प्रवर्तक ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात ४५ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

डॉ. विखे पाटील यांच्या सूचनेनुसार कोणताही डामडौल न करता साध्या पद्धतीने स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत २४ संघ सहभागी झाले असून, चार दिवस चालणाऱ्या स्पर्धेतील सामने बाद पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत. विजेत्या संघांसाठी दोन लाख रुपयांहून अधिक रोख बक्षिसे आणि आकर्षक चषक ठेवण्यात आले आहेत. प्रथम क्रमांकासाठी ७१ हजार, द्वितीय क्रमांकासाठी ५१ हजार, तृतीय क्रमांकासाठी ३१ हजार, तर चतुर्थ क्रमांकासाठी २१ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. याशिवाय मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांनाही वैयक्तिक पारितोषिके देण्यात येणार आहेत.

सध्या रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन अमोल सागडे मित्रमंडळाच्या वतीने दिवसभर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त ४५ चाहत्यांनी रक्तदान करून वाढदिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. अहिल्यानगर येथील जनकल्याण रक्तपेढीच्या डॉ. विलास मढीकर यांच्या पथकाने रक्तसंकलन केले.

स्पर्धेच्या आयोजनासाठी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अमोल सागडे यांनी विशेष पुढाकार घेतला. मैदान उपलब्ध करून देण्यासाठी कुसारे सर, डॉ. दिनेश राठी आणि अभय बेडे यांचे सहकार्य लाभले. स्पर्धेचे युट्युब चॅनेलवरून थेट प्रक्षेपण करण्यात येणार असून, प्रख्यात क्रिकेट समालोचक इंजि. विराज देशमुख यांच्या समालोचनामुळे क्रिकेटप्रेमींना सामन्यांचा आनंद घेता येणार आहे.

यावेळी ज्येष्ठ नेते अरुण पाटील लांडे, शिवसेनेचे नेते अरुण मुंढे, संजय फडके, फुलचंद रोकडे, अण्णासाहेब ढोके, विजय देशमुख, कुलदीप फडके, राहुल देशमुख, गणेश कराड, संजय खेडकर, संजय आंधळे, बाळासाहेब कोळेकर, अंबादास ढाकणे, जावेद शेख, दीपक शिंदे, बाळासाहेब डोंगरे यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि क्रीडारसिक उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी नितीन सागडे, अण्णासाहेब राख, देवीदास हरदास, यश डमाळ, सौरभ डमाळ, अलीम शेख, मनोज हरवने, अजिनाथ जताडे, प्रवीण काळे, काकासाहेब जाधव यांच्यासह आयोजकांनी परिश्रम घेतले. स्पर्धेच्या प्रारंभामुळे शेवगाव परिसरातील क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

क्रीडा आणि सामाजिक बांधिलकीचा संगम!

■ डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून क्रीडाप्रेमींना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. त्याचबरोबर रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमाची जोड देण्यात आल्याने 'छत्रपती चषक २०२६' स्पर्धेची सुरुवात सामाजिक संदेश देणारी ठरली.

शिर्डीत परीट-धोबी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर मेळावा उत्साहात

महंत रामगिरी महाराज, अशोकजी महाराज यांची उपस्थिती । चार मान्यवरांना राष्ट्रसंत गाडगेबाबा जीवनगौरव पुरस्कार प्रदान

● शिर्डी । वीरभूमी–



डेबूजी प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आणि रेशीमगाठी वधू-वर मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री साईबाबांच्या पावनभूमी शिर्डी येथे आयोजित परीट-धोबी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यास राज्यभरातून समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

मेळाव्यास गोदाधाम संस्थानचे महंत परमपूज्य रामगिरी महाराज तसेच लखनऊ येथील ज्वालामाता मंदिराचे पीठाचार्य परमपूज्य अशोकजी महाराज चौधरी यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला आध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीरामपूरचे माजी नगराध्यक्ष संजय फंड होते.

यावेळी समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या चार मान्यवरांना या मेळाव्यात राष्ट्रसंत गाडगेबाबा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

परीट-धोबी समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश व्हावा, यासाठी महाराष्ट्रासह राज्याबाहेर दौरे करून ऐतिहासिक पुरावे व माहिती संकलित करणारे तसेच भांडे समितीसमोर समाजाच्या समावेशासाठी शिफारस होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रयत्न करणारे भांडे समितीचे सदस्य स्व. गुणवंतराव लक्ष्मणराव फाले गुरूजी यांना मरणोत्तर राष्ट्रसंत गाडगेबाबा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याशिवाय पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ कदम, उद्योगपती उत्तमराव तेलंगे आणि नाशिक येथील सामाजिक कार्यकर्ते राजूशेठ आहेर यांनाही जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

समाजातील उपवर वधू-वरांना परिचयासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, विवाह जुळवणीची प्रक्रिया सुलभ करणे आणि समाजामध्ये संवाद, सहकार्य व एकोपा वाढविणे हा मेळाव्याचा मुख्य उद्देश असल्याचे डेबूजी प्रतिष्ठानचे संस्थापक राजेंद्र फंड यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डेबूजी प्रतिष्ठानचे संस्थापक राजेंद्र फंड यांनी केले. दोन सत्रांतील आभार प्रदर्शन प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष माधवराव देसाई आणि साईनाथ हजारे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन तसेच वधू-वर व पालकांसाठी विचारमंथन केव्हीके प्रवरा कम्युनिटी रेडिओच्या मुख्य निवेदिका गायत्री म्हस्के यांनी केले.

मेळाव्याच्या नियोजनासाठी डेबूजी प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सुनील निकम (लोणी), खजिनदार सुधाकर वाघ (प्रवरानगर), उपाध्यक्ष माधवराव देसाई (पुणे), जिल्हा उपनिबंधक सहकार विभाग, पुणे व मार्गदर्शक दिगंबर हौसारे, सहसचिव अनिल देसाई (अस्तगाव), सहखजिनदार विलासराव रोकडे (पाथरे), डॉ. गणेश वाघ (येवला), सोपानराव भागवत (गळनिंब), किशोरजी गवळी (उपकार्यकारी अभियंता, साईबाबा संस्थान, शिर्डी), रेशीमगाठी वधू-वर मंडळाचे अध्यक्ष अनिलराव खडके, योगेश रोकडे (नाशिक), साईनाथ हजारे (छत्रपती संभाजीनगर), आर्थिक सल्लागार चार्टर्ड अकाउंटंट विजय क्षीरसागर (अहिल्यानगर), उपजिल्हाप्रमुख दिनेश बोरुडे, प्रसिद्धी प्रमुख महादेव दळे (संपादक, वीरभूमी), पत्रकार राजेंद्र देसाई (श्रीरामपूर), पत्रकार योगेश सगर, सुरेश मुळे आणि गणेश रोकडे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते हनुमंत गवळी, राजाभाऊ जगताप, सुनील जाधव, शशिकांत बर्वे, ईश्वर गायकवाड, बाबासाहेब आदमाने, भारत गवळी, सुनील राऊत, गोरख भागवत, कचरू पाचंगरे, रामनाथ बोरुडे, सुदाम मढीकर, संतोष राऊत, शिवाजी लिगायत, कैलास निकम, राजेंद्र बोरुडे, संजय सोनवणे, ज्ञानेश्वर चौधरी, विजय बोरुडे, दिलीप गायकवाड, आबा त्रिभुवन, राजू राऊत, अशोक शिंदे, श्रीधर जाधव, जनाभाऊ घोडके, संगीता बाविस्कर, योगिता सुरे, योगिता भागवत, सचिन वाघ आणि विजय आघाडे यांनी मेळाव्याच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या डेबूजी प्रतिष्ठानच्या सदस्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. समाजातील वधू-वरांना एकत्र आणण्यासोबत सामाजिक बांधिलकी, एकोपा आणि समाजाच्या ऐतिहासिक योगदानाचा गौरव करणारा हा राज्यस्तरीय मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

सह्याद्रीतील विनाशकारी प्रकल्प थांबवा; निसर्ग आणि पर्यावरणाचे रक्षण करा!

पद्मश्री राहीबाई पोपरे यांचे आवाहन । घाटघर येथे १० वे निसर्ग व सामाजिक पर्यावरण संमेलन उत्साहात

● अकोले । वीरभूमी –

भगवान बिरसा मुंडा व आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या जयंतीनिमित्त आणि भंडारदरा धरणाच्या शताब्दी महोत्सवाचे औचित्य साधून घाटघर इकोसिटी येथे १० वे निसर्ग व सामाजिक पर्यावरण संमेलन उत्साहात पार पडले.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना पद्मश्री राहीबाई पोपरे यांनी राज्यातील जंगलतोड तातडीने थांबवण्याचे आवाहन केले. आदिवासींचे अस्तित्व धोक्यात आणणारे विनाशकारी प्रकल्प सह्याद्रीत राबवू नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले. औपचारिक शिक्षण नसतानाही निसर्ग आणि मातीशी असलेल्या नात्यामुळे आपल्याला सन्मान मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

संमेलनाचे उद्घाटन लिज्जत पापडचे कार्यकारी संचालक सुरेशराव कोते यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुण्या समाजसेविका हेमलताताई पिचड यांनी दिवंगत मधुकरराव पिचड यांच्या माध्यमातून तालुक्यात झालेल्या विकासकामांचा आढावा घेतला. राजूर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात महिलांना संघटित करून मोर्चे काढणे, ग्रामसभेत ठराव करणे आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करून राजूरसह अकोले तालुक्यात दारूबंदी घडवून आणल्याचे अनुभव त्यांनी मांडले.

निसर्ग माणसाला सतत देत असतो; मात्र त्याच्याकडून काहीही घेत नाही. निसर्गाचे आपल्यावर अनंत उपकार असून त्याचे संवर्धन व जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे सुरेशराव कोते यांनी सांगितले. सीएसआर प्रमुख संतोष जगधने यांनी जलसंधारण आणि उत्खननामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचे विश्लेषण केले.

संस्थेचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी हे संमेलन राज्याला दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. सह्याद्री पर्वतरांगांमध्ये आगी लावण्याचे प्रमाण वाढत असून ते रोखण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. पर्यावरण, जैवविविधता आणि पशुपक्ष्यांचे संरक्षण करण्यासाठी सह्याद्रीत राहणाऱ्या प्रत्येकाने काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. उपाध्यक्ष रामनाथ भोजने यांनी 'उलगुलान' आणि भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले.

संमेलनात पद्मश्री राहीबाई पोपरे, हेमलताताई मधुकरराव पिचड आणि पुष्पाताई किरण लहामटे यांना 'वृक्षमित्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी 'सह्याद्री वृत्तदीप' या मासिकाचे प्रकाशनही करण्यात आले. निसर्ग आणि ग्रामीण भागातील जनतेच्या कल्याणासाठी मासिकातून सातत्याने लेखन केले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. भंडारदरा धरणाचा शंभर वर्षांचा इतिहास, भारतीय संविधान आणि पर्यावरणाचे महत्त्व यावर मासिकात विशेष लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत. पर्यावरणप्रेमींनी या उपक्रमाचे कौतुक केले.

संमेलनाला पुष्पलताताई लहामटे, कार्याध्यक्षा छायाताई राजपूत, सचिव वनश्रीताई मोरे-गुणवरे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब डोंगरे, इंजि. नामदेव गंभीरे, वनपाल शंकर लांडे, विलास घोडे, दिगंबर नवाळी, अमोल चंदनशिवे, सचिन देशमुख, नारायण जगधने, सतीश नेहे, किसन कडू यांच्यासह राज्यभरातून आलेले पर्यावरणप्रेमी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गिते, वनक्षेत्र अधिकारी रूपेश गावित, पिचड, प्रा. डॉ. नानासाहेब गोफणे, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील घुले, बाळासाहेब कडू यांच्यासह राज्यभरातून आलेले पर्यावरणप्रेमी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश शिंदे यांनी केले. महेश पाडेकर आणि विजय पांडे यांनी आभार मानले.

गुणवत्तापूर्ण शिक्षण ही काळाची गरज : सीताराम खिलारी

श्री ढोकेश्वर विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

● पारनेर । वीरभूमी–

भविष्याचा वेध घेणारे आणि विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर विद्यालयात आयोजित माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



खिलारी पुढे म्हणाले की, डिजिटल शिक्षणामुळे प्रगतीची नवी दालने खुली झाली आहेत. शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) प्रणालीचा वापर वाढत असून, विद्यार्थ्यांनी काळाची गरज ओळखून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. आधुनिक शिक्षणपद्धतीचा स्वीकार करून विद्यार्थ्यांनी भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी.

प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, संभाजी रोहोकले, डॉ. भाऊसाहेब खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, ॲड. रघुनाथ खिलारी, जबाजी दाते, प्रा. पी. एम. साठे, गोवर्धन निमसे, ए. डी. ठुबे, प्रा. बाबासाहेब मोटे, प्रा. बाबासाहेब बोरुडे, मल्हारी वागसकर, प्रा. बंदरकर, गोवर्धन रोहोकले, तारकाराम झावरे यांच्यासह अनेक मान्यवर व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मंगेश खिलारी, स्वाती भालेकर, प्रा. ठाणगे, संभाजी रोहोकले, सतीश रोकडे, प्रकाश इघे व प्रा. पी. एम. साठे यांनी मनोगत व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या विकास निधीसाठी देणगी दिली. सोनल रोहोकले व बाबासाहेब जाधव यांनी सूत्रसंचालन केले, तर श्री. मते यांनी आभार मानले.

माजी विद्यार्थी व लोकसहभागातून विद्यालयात तीन लाख रुपये खर्चाचे शुद्ध पाणी व मिनरल वॉटर प्लांटचे मशीन उपलब्ध झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळणार असल्याची माहिती प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी दिली.

नगराध्यक्ष पराग संधान यांच्या पाठपुराव्याला यश, १८ कामगारांच्या वारसांना मिळणार नोकरीची संधी

● कोपरगाव । वीरभूमी–

राज्यातील नगरपरिषदा व नगरपालिकांमध्ये लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने सेवेत सामावून घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार कोपरगाव नगरपरिषदेच्या आस्थापनेवर यापूर्वी १९ सफाई कामगारांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, यापैकी १८ कर्मचारी सेवानिवृत्त अथवा मयत झाल्यामुळे त्यांच्या वारसांना वारसा हक्काने सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता.

या कामगारांच्या वारसांना न्याय मिळावा आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे, यासाठी संबंधित कर्मचारी व त्यांचे वारसदार गेल्या वर्षभरापासून सातत्याने प्रयत्न करीत होते. या प्रश्नाची गांभीर्याने



दखल घेत नगराध्यक्ष पराग संधान यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार अखेर या १८ सफाई कामगारांच्या वारसांना सेवेत सामावून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाला मार्ग मिळाला असून संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.

दरम्यान, कोपरगाव नगरपरिषदेतील आणखी २७ रोजंदारी कर्मचाऱ्यांचा सेवेत कायम करण्याचा प्रश्न गेल्या तीस वर्षांपासून प्रलंबित आहे. अनेक वर्षे सेवा करूनही या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेचा लाभ मिळालेला नाही. या कर्मचाऱ्यांची अडचण लक्षात घेऊन त्यांचाही प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिले आहे.

सफाई कामगार व रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ प्रशासकीय बाब म्हणून न पाहता त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाशी आणि भविष्याशी निगडित महत्त्वाचा विषय म्हणून पाहिले जात आहे. नगराध्यक्ष पराग संधान यांच्या पुढाकारामुळे १८ कामगारांच्या वारसांना सेवेत सामावून घेण्याचा मार्ग मोकळा झाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.यावेळी आरोग्य सभापती वैभव आढाव,विनोद राक्षे यांच्यासह सदर विषय मार्गी लावलेले नागरिक कुटुंब उपस्थित होते.

अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे व आमदार विवेकभैय्या कोल्हे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्यामुळे सदर विषय लवकरात लवकर पूर्णत्वास जाऊ शकला. मुख्याधिकारी अजित निकत व नगरपरिषदेचे अधिकारी यांनी प्रशासकीय पातळीवरील कामकाजाला अपेक्षित सहकार्य करून गती दिली त्यामुळे विशेष समाधान या कुटुंबांना न्याय मिळाल्याचे आहे अशी प्रतिक्रिया नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली.

शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील आठ ठिकाणच्या एसटी बस थांब्यासाठी १ कोटी ६० लाखांचा निधी मंजूर

आ. मोनिका राजळे यांच्या मागणीला यश । लवकरच कामांना सुरुवात

● शेवगाव । वीरभूमी –

शेवगाव व पाथर्डी तालुक्यांतील आठ ठिकाणी अद्ययावत एसटी बस प्रवासी थांबे उभारण्यास राज्य परिवहन महामंडळाने मंजुरी दिली आहे. प्रत्येक बस थांब्यासाठी २० लाख रुपयांप्रमाणे एकूण १ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार मोनिका राजळे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, लवकरच या कामांना सुरुवात होणार आहे.

शेवगाव-पाथर्डी मतदारसंघ ग्रामीण भागात असल्याने सर्वसामान्य प्रवाशांसाठी एसटी बस हे महत्त्वाचे वाहतुकीचे साधन आहे. ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार मोठ्या प्रमाणावर एसटीने प्रवास करतात. मात्र, अनेक ठिकाणी मुख्य रस्त्यांवर



बस थांबे नसल्याने प्रवाशांना ऊन, वारा आणि पावसात बसची वाट पाहावी लागते. ही गैरसोय दूर करण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे बस थांबे उभारण्याची मागणी केली होती.

त्यानुसार पाथर्डी तालुक्यातील जवखेडे फाटा (तिसगाव-मिरी रोड), टाकळी मानूर, चिंचपूर इजदे आणि कासाळवाडी फाटा, तसेच शेवगाव तालुक्यातील मळेगाव, भातकुडगाव फाटा, भाविनिमगाव आणि कोळगाव या आठ ठिकाणी बस थांबे उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. प्रत्येक ठिकाणी सुमारे २० लाख रुपये खर्चून अद्ययावत प्रवासी थांबा उभारण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील एसटी प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी निधी मंजूर केल्याबद्दल आमदार मोनिका राजळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार मानले आहेत.

या बस थांब्यांमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना ऊन, वारा व पावसापासून संरक्षण मिळण्यासह प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे.

महांडूळवाडी ग्रामस्थांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा!

महिला, लहान मुले आणि जनावरांचाही सहभाग । पाझर तलावाजवळील अतिक्रमणे हटविण्याची मागणी

● श्रीगोंदा । वीरभूमी–

गावातील तीव्र पाणीटंचाई आणि पाझर तलावांवरील अतिक्रमणांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महांडूळवाडी (ता. श्रीगोंदा) येथील ग्रामस्थांनी सोमवारी (दि. १६) जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा काढला. महिलांनी रिकामे हंडे घेऊन, तर लहान मुले आणि जनावरांना सोबत घेऊन आंदोलनात सहभाग नोंदविला. पाणीटंचाईचे भीषण वास्तव प्रशासनासमोर मांडत पाझर तलावांची शासकीय मोजणी करून अतिक्रमणे हटविण्याची मागणी करण्यात आली.

प्रशासनाने १६ नोव्हेंबर रोजी पाझर तलावांच्या शासकीय मोजणीचे नियोजन केले होते. मात्र, निश्चित दिवशी मोजणी न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. सर्व पाझर तलावांची तातडीने मोजणी करावी, अतिक्रमणे कायदेशीररीत्या हटवावीत आणि मोजणीच्या कामात अडथळे आणणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशा मागण्या करण्यात आल्या. प्रत्यक्ष मोजणी व अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार



ग्रामस्थांनी व्यक्त केला.

या आंदोलनाला पावन फाउंडेशन व संभाजी ब्रिगेडने पाठिंबा दिला. यावेळी इंजि. शामभाऊ जरे, प्रफुल्ल जगताप, पांडुरंग खोरे, घनशाम काळे आणि संतोष आरडे उपस्थित होते.

या आंदोलनात वैशाली आनंद दरेकर, पुनम दत्तात्रय महांडुळे, वर्षा रवींद्र महांडुळे, मंगल शंकर देवकर, सुवर्णा संजय देवकर, अर्चना गणेश मंडळे, शितल अक्षय दरेकर, वर्षा केशव महांडुळे, सिंधू लहानू महांडुळे, रूपाली भरत घोगरे, रोहिणी गणेश घोगरे, जया भाऊसाहेब महांडुळे, नंदाबाई नाना महांडुळे, छाया रोहिदास महांडुळे, स्वाती सुभाष महांडुळे, मंगल महांडुळे, हौसाबाई रामदास देवकर, आनंदा अमृता दरेकर, ऐश्वर्या अक्षय दरेकर, शंकर देवकर, रवींद्र राजाराम महांडुळे, प्रकाश ज्ञानदेव घोगरे, दत्तात्रय बाळकृष्ण महांडुळे, उत्तम ज्ञानदेव घोगरे, गणेश देवकर, अतुल लोखंडे, अजय पवार, मारुती घोगरे, पोपट महांडुळे, संजय देवकर, छगन देवकर, बजरंग धनवट, गोरख गुंजाळ, संदीप महांडुळे, गणेश घोगरे, सुभाष महांडुळे, रोहिदास महांडुळे, एकनाथ महांडुळे, अक्षय दरेकर, विनायक घोगरे, नवनाथ देवकर, राम महांडुळे, पोपट बबन महांडुळे, संतोष देवकर, रामदास महांडुळे, भागवत महांडुळे, भाऊ नामदेव महांडुळे, केशव महांडुळे, युवराज बाळकृष्ण बापू धनवट महांडुळे, उत्तम रामदास देवकर, शिवम महांडुळे, सार्थक मांडोळे, सिद्धार्थ महांडुळे, हरिचंद्र धनवट, ज्ञानदेव घोगरे, ओमकार दरेकर, व्यंकटेश आनंदा दरेकर, ओम तात्यासाहेब दरेकर, अजय धनवट, युवराज बाळकृष्ण महांडुळे आदी सहभागी झाले होते. पाणी हा आमचा हक्क आहे, उपकार नाही. पाणीप्रश्नाला न्याय मिळेपर्यंत संघर्ष थांबणार नाही, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.

पाथर्डीत माहेश्वरी समाजाचा अन्नकूट उत्सव भक्तिभावात साजरा!

श्रीराम मंदिरात ५६ भोगांची महाआरती आणि महाप्रसाद । राजस्थानी परंपरेतील 'खिचडा' प्रसादाचा भाविकांनी घेतला लाभ

● पाथर्डी । वीरभूमी–

येथील माहेश्वरी श्रीराम मंदिरात भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने अन्नकूट उत्सव साजरा करण्यात आला. आबालवृद्धांपासून ज्येष्ठांपर्यंत समाजातील सर्व बांधव या उत्सवात सहभागी झाले. विशेष म्हणजे परगावी स्थायिक झालेले माहेश्वरी बांधवही उत्सवासाठी आवर्जून उपस्थित राहिले. महाआरती, ५६ भोग आणि महाप्रसादामुळे मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

भगवान श्रीकृष्णांनी जलप्रलयापासून गोमाता आणि आपल्या सवंगड्यांचे रक्षण करण्यासाठी गोवर्धन पर्वत करंगळीवर उचलला, अशी धार्मिक आख्यायिका आहे. संकटातून रक्षण झाल्यानंतर गोपालक आणि कृष्णाच्या सवंगड्यांनी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपापल्या घरून आणलेली शिदोरी एकत्र केली. या अन्नाचा छोट्याशा डोंगरासारखा ढीग तयार झाला. गोमातांना भोजन दिल्यानंतर उरलेला प्रसाद सर्वांनी मिळून ग्रहण केला. या प्रसंगाचे महत्त्व लक्षात घेऊन अन्नकूट उत्सव साजरा करण्याची परंपरा सुरू झाल्याचे विविध धर्मग्रंथांच्या संदर्भातून सांगितले जाते.

या आख्यायिकेनुसार, त्या प्रसादाचा लाभ मिळावा म्हणून ३३ कोटी देवी-देवता विविध रूपांत तेथे उपस्थित झाल्या. भगवान श्रीकृष्णांनी त्यांना आशीर्वाद देत सवंगड्यांना प्रसाद देण्याची सूचना केली. सर्व देवी-देवतांनी भोजन करूनही अन्नाचा ढीग तसूभरही कमी झाला नाही. या अद्भुत शक्तीपुढे नतमस्तक होत देवी-देवतांनी, ज्या ठिकाणी अन्नकूट उत्सव साजरा होईल आणि गोमातेचे पूजन केले जाईल, तेथील प्रसाद ग्रहण करणाऱ्यांवर सर्व देवी-देवतांची कृपा राहील, असा आशीर्वाद दिल्याची धार्मिक मान्यता आहे. या सेवाकार्यात साक्षात अन्नपूर्णा माता गोमातेच्या रूपात उपस्थित होती, असेही मानले जाते.

बलिप्रतिपदा अर्थात पाडव्याच्या दिवशी अन्नकूट उत्सव साजरा करण्याची परंपरा आहे. मात्र, पाथर्डीतील माहेश्वरी समाजातर्फे बलिप्रतिपदेनंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी हा उत्सव आयोजित केला जातो. यानिमित्त श्रीराम मंदिरात समाजातील प्रत्येक कुटुंबाने भगवान श्रीरामांसाठी स्वतंत्रपणे मिष्टान्न प्रसाद आणला होता. या विविध पदार्थांना '५६ भोग' असे म्हटले जाते. महाआरतीनंतर सर्व प्रसाद एकत्र करून भाविकांना वितरित करण्यात आला.

या उत्सवात राजस्थानी परंपरेचाही विशेष प्रभाव दिसून आला. थंडीपासून गोमाता आणि भाविकांचे रक्षण व्हावे, या उद्देशाने बाजरीचा भरडा, शुद्ध तूप आणि गूळ एकत्र करून तयार केलेला 'खिचडा' प्रसाद आवर्जून दिला जातो. श्रद्धेने हा प्रसाद ग्रहण केल्याने आरोग्य लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. उत्तर भारतातून ही प्रथा सुरू झाल्याचे सांगितले जाते. यावर्षी शहरातील मंत्री परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

समाजातील सर्व बांधव महाआरती आणि महाप्रसादासाठी एकत्र येत असल्याने सामाजिक ऐक्य, परस्पर प्रेमभाव आणि बंधुभाव अधिक दृढ होतो. तसेच समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी आणि धार्मिक उत्सवांच्या आयोजनासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प या निमित्ताने करण्यात आला.

या उत्सवाच्या आयोजनात माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत जाजू, जगदीश लोहिया, महेश बाहेती, सागर बाहेती, योगेश कलंत्री, राधेश्याम मंत्री, रितेश मंत्री, आलोक बंग, प्रणव जाजू, गोविंद लाहोटी, सचिन डागा, पुष्कर मंत्री, सतीश राठी आदी कार्यकर्त्यांसह माहेश्वरी महिला मंडळ, माहेश्वरी पंच ट्रस्ट,



माहेश्वरी राम मंदिर ट्रस्ट आणि पाथर्डी तालुका माहेश्वरी सभा यांच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अन्नाची नासाडी होऊ नये, यासाठी माहेश्वरी समाजाकडून विशेष दक्षता घेतली जाते. उत्सवानिमित्त राम मंदिराचा गाभारा आकर्षक फुलांनी सजविण्यात आला होता. धार्मिक विधींचे पौरोहित्य वेदशास्त्रसंपन्न सारंग देवा तारे यांनी केले. उत्सवात सर्व समाजबांधवांनी सक्रिय सहभाग नोंदवून शोभा वाढविल्याबद्दल युवक मंडळाच्या वतीने आभार मानण्यात आले.